प्रश्नपेढी– सत्र ४–पेपर ३

१.बोली भाषेच्या कोणत्या रूपाला आधिक महत्त्व असते ?

अ) लिखित

ब) मौखिक

क) पारिभाषिक

ड) ग्रांथिक

२.कोणत्या गोष्टींचे साधन म्हणून बोली वापरली जात असते ?

अ) शैक्षणिक व्यवहार

ब) शासकीय व्यवहार

क) दैनंदिन व्यवहार

ड) वैद्यकीय व्यवहार

३. मालवणी बोली कोणत्या जिल्ह्यांत वापरली जाते ?

अ) रायगड व रत्नागिरी जिल्हा

ब) मुंबई महानगर व रत्नागिरी जिल्हा

क) कोकण व कुलाबा

ड) सिंधुदूर्ग आणि रत्नागिरी जिल्हा

४. “मिया वाचतंय” या वाक्याचा काळ ओळखा.

अ) भविष्यकाळ

ब) वर्तमानकाळ

क) भूतकाळ

ड) रीती भूतकाळ

५.रंगवाचक विशेषणांचा अंत्य स्वर मालवणी भाषेत कोणता असतो ?

अ) अकारान्त

ब) ओकारान्त

क)आकारान्त

ड) इकारान्त

६.कोणत्या आर्योदभव भाषेशी मालवणी भाषेचा अन्य बोलीभाषांपेक्षा अधिक संबंध आहे असे विद्या प्रभू आपल्या संशोधनात सांगतात ?

अ) तमिळ

ब) तेलगु

क) संस्कृत

ड) प्राकृत

७.प्रविण दशरथ बांदेकर यांच्या कोणत्या कादंबरीत मालवणी भाषेचा वापर चांगल्याप्रकारे केला गेला आहे ?

अ) उजव्या सोंडेच्या बाहुल्या

ब) चाळेगत

क) सत ना गत

ड) भोवळ

८.वारूळ या प्रविण बांदेकर यांच्या कवितेतील वारूळ ही मिथक प्रतिमा कशाची आहे ?

अ) घर

ब) कुटुंब

क) मातृदेवता

ड)वाल्मिकी रामायण

९. तिरडीवरून उठल्यावर तावडन आजीने काय केले?

अ) सगळ्यांना शिव्या दिल्या

ब) रडू लागली

क) मुसंबी मुसंबी म्हणत हसली

ड) औषध मागू लागली

१०.कालेलकरणीच्या मांगरातला गटारीच्या दिवशी चोरण्याची जबाबदारी कोणी घेतली होती ?

अ) कदमिणीने

ब) पक्याने

क) पाट्याने

ड) संत्याने

११.दर्याराजा या कवितेतील कोळ्याला म्हावरं का मिळत नव्हतं ?

अ) समुद्राला ओहोटी होती

ब) मतमाऊलीचा कोप झाला होता

क) भर दुपारी सोसाट्याचा वारा वाहात होता

ड) दर्याला त्याने नारळ दिला नव्हता

१२.शेताभातातलो शिरवान या कवितेत कवी चिखल पायाला लागला तर शेतकऱ्याने तो कोणावर उडवू नये असे का म्हणतो ?

अ) कारण चिखल उडवला तर भांडणे होतात

ब) कारण चिखल फक्त शिमग्याला उडवतात

क) कारण त्याच चिखलातून नवं पिक उगवून येते

ड) कारण चिखलातच शेतीसाठी उपयोगी गांडूळ असतात

१३.रोज संध्याकाळी तांबट पसरलेल्या मांडवाखाली गावातील लोक का जमत असे अजय कांडरांची कविता सांगते ?

अ) गजाली करायला

ब) भगल करायला

क) गाळ्यो द्यायला

ड) मन मोकळा करायला

१४.खेळे कवितेतील प्रियकर आपल्या एकेकाळच्या प्रेयसीच्या घराच्या ओसरीवर बसून कोणत्या देवआची माफी मागतो ?

अ) खंडोबाची

ब) रवळनाथाची

क) दामोदराची

ड) विठ्ठलाची

१५.भातालय कवितेतील शेतकरी शेताचे वर्णन करताना कारभारणीच्या आवडीची कोणती रोपे लावल्याचे  सांगतो ?

अ) शेवंती

ब) मदनबाण मोगरा

क) अबोली

ड) गुलाब

१६.जात्रा कवितेतल्या कोणाचा बायकांवर वाईट डोळो असतो ?

अ) नामा कुळकार

ब) दादा भट

क) इठो गावकार

ड) सदा डिचोलकर

१७.चाकरमानी नाटकातील येनु मावशीला लाकडच्या भाऱ्याचे पैसे कमी देण्याची लबाडी कोण करतो ?

अ) लक्ष्या

ब)डिच्या

क) दादा भट

ड) ज्ञानेश्वर

१८.चाकरमानी नाटकात सीताराम पैसे संपल्यावर कोणाकडे कर्ज मागतो ?

अ) दादा भटाकडे

ब) सखू गाबतिणीकडे

क) हॉटेलवाल्या लक्ष्मणाकडे

ड) सलूनवाल्या डिचोलकराकडे

१९.सोनक्याच्याची अर्धवट राहिलेली दाढी पूर्ण करून द्यायला सीताराम डिच्याला किती पैसे देतो ?

अ)आठ आणे

ब) पाच रूपये

क) पंधरा रूपये

ड) दहा रूपये

२०.सोनक्याच्याला मातीत कोण लोळवतो ?

अ) सीताराम

ब) लक्ष्या

क) पाट्या

ड) दादा भट

२१.घाडी मामा कोणतं काम करतो ?

अ) शेतीचे

ब) कोळ्याचे

क) गाऱ्हाण्याचे

ड) सुताराचे

२२.हरी आणि ज्ञानेश्वर सितारामसमोर येनूमावशीला कोणती मदत करू लागतात?

अ) नळे परतण्याची

ब) धुणी पिळण्याची

क) घरातला केर काढण्याची

ड) अंगण सारवण्याची

२३.डिच्याने पुढे केलेल्या पावडरला सीताराम काय म्हणत नाकारतो ?

अ) चुना

ब) माती

क) राख

ड) खडूची भुकटी

२४.सीताराम हरी आणि धेन्याला होळीची वर्गणी नाकारताना काय सांगतो ?

अ) आधी पुलासाठी गोळा केलेल्या वर्गणीचा हिशोब द्या

ब) वर्गणीचे पैसे गोळा करून दारू पिऊ नका

क) वर्गणीशिवाय होळी पेटवा

ड) लाकडाची चोरी करू नका

२५.लक्ष्मण हॉटेलवाल्याचे कर्ज चुकवायला सीताराम काय गहाण ठेवणार आहे ?

अ) अनसुयेच्या बांगड्या

ब) पाट्याची सोन्याची चेन

क) ट्रान्झिस्टर

ड) येनू मावशीचे सोन्याचे काप

२६. 'चाकरमानी' या नाटकात मालवणी माणसांचे कोणते स्वभाववैशिष्ट्य प्रामुख्याने दाखवले गेले आहे ?

अ) रिकामटेकडेपणा

ब) उदारपणा

क) स्नेहशील स्वभाव

ड) प्रामाणिकपणा

२७.मालवणातील खेड्यातील माणसांचा कोणता स्वभावविशेष कावळ्याच्या रूपकातून नाटककाराने व्यक्त केला आहे ?

अ)काळ्या जादूची आवड

ब) आदरातिथ्य करण्याचा स्वभाव

क) स्वार्थी क्रूरपणा

ड) हुशारपणा

२८.सीताराम पालकर गावातील लोकांना पैसे का देत राहतो ?

अ) कारण त्याला लोकांची दया येते

ब) कारण तो खूप श्रीमंत आहे.

क) कारण लोकं त्याची कामे करतात

ड) कारण त्याला आपला मोठेपणा मिरवायचा आहे

२९. ‘चाकरमानी’ नाटकाच्या शेवटी सिताराम भिक्याला कोणते काम सांगतो की जे भिक्या करत नाही ?

अ) कोंबडा कापायला सांगतो

ब) मासे आणायला सांगतो

क) झाडावरची अडसरं काढायला सांगतो

ड) आंबे आणून द्यायला सांगतो

३०.सिताराम शहरात असताना येनुमावशी हरी, ज्ञानेश्वरकडे कोणती मदत मागते की जी ते करत नाहीत ?

अ) पैसे मागते

ब) लुगडं मागते

क) नळे परतवायला सांगते

ड) झाडावरचे आंबे काढून मागते

३१.घाडी मामा वेडा कशामुळे झाला आहे ?

अ) त्याची बायको त्याला सोडून गेली आहे

ब) त्याच्या गाऱ्हाण्यात पाट्या व्यत्यय आणतो म्हणून

क)त्याचे शेत सावित्रीच्या पूरात वाहून जाते म्हणून

ड) दादा भट त्याच्यावर चोरीचा आरोप करतो म्हणून

३२.डिच्या अनसुयेकडे का येत असतो ?

अ) गाऱ्हाणं घाल म्हणजे मुल होईल हे सांगायला

ब) शिळोप्याच्या गप्पा मारायला

क) अनसुयेला आपल्या नादी लावून गैरफायदा घ्यायला

ड) भिक्याला काम द्यायला

३३.'भगल' या मालवणी शब्दाचा अर्थ काय ?

अ) शिवी

ब) पेरणी

क) चेष्टा

ड) जमिन जाळणे

३४.सिताराम पालकर दादा भटाबरोबर कसली स्पर्धा करू पाहतो ?

अ) मंत्र म्हणण्याची

ब) जिलेब्या खाण्याची

क) ज्योतिष सांगण्याची

ड) गाण्याची

३५.हरी आणि ज्ञानेश्वरला सितारामचा राग का येतो ?

अ) अनसुया सितारामला चहा देते म्हणून

ब) अनसुयेची बदनामी करण्यामागे त्यांना दोषी ठरवले जाते

क) सिताराम होळीची वर्गणी देत नाही म्हणून

ड) सिताराम पुलाच्या वर्गणीचे पैसे कुठे गेले विचारतो म्हणून

३६. लक्ष्या दादा भटाच्या तिर्थाच्या तांब्यात काय भरतो ?

अ) दारू

ब) अडसराचे पाणी

क) हॉटेलातले पाणी

ड) डबक्यातले पाणी

३७.सखु गाबतिणीला अनसुया का आवडते ?

अ) अनसुया तिच्याकडून रोज मासे घेते म्हणून

ब) अनसुया तिला पैसे उसने देते म्हणून

क) अनसुया आपलं दुःख मनात ठेवून हसतमुख राहते म्हणून

ड) अनसुया भिक्याला शिव्या घालते म्हणून

३८. सीताराम येनु मावशीचे विचार कसे नाहीत असे म्हणतो ?

अ) मॉडर्न

ब) प्रगतीशील

क) पोग्रेशीव

ड) पार्शल

३९.हरी होळीला कोणाच्या नावाने बोंब मारतो म्हणून सिताराम चिडतो ?

अ) भिक्याच्या बायकोच्या नावाने

ब) लक्ष्याच्या नावाने

क) भिक्याच्या नावाने

ड) दादा भटाच्या नावाने

४०.सितारामच्या भाषेचे वैशिष्ट्य काय ?

अ) तो प्रत्येक वाक्याला गाळी देतो

ब) तो सानुनासिक बोलतो

क) तो इंग्रजी शब्द चुकीचे उच्चारतो

ड) तो र च्या ऐवजी ळ उच्चारतो

४१.येनुमावशी आणि अनसुया या स्त्रियांच्या समान स्वभावविशेष कोणता ?

अ) दोघी साध्या आहेत

ब) दोघी अंधश्रद्धाळू आहेत

क) दोघी स्वाभिमानी आहेत

ड) दोघी कंजुष आहेत

४२.सितारामच्या कोणत्या परिस्थितीची हरी व ज्ञानेश्वर खिल्ली उडवतात ?

अ) सितारामचे अविवाहीत असणे

ब) सितारामच्या लहान भावाने त्याचे न ऐकणे

क) सितारामकडील सर्व पैसे संपणे

ड) अनसुयेबद्दल सितारामला आकर्षण असणे

४३.होळीच्या दिवशी पाट्या कुठे असतो ?

अ) होळीसाठी लाकडे गोळा करण्यासाठी जंगलात

ब) होळीच्या शबय मागण्याच्या मिरवणुकीत

क) भांग बनवणाऱ्या भय्याकडे

ड) आजोळी

४४.भिक्या होळी पेटली तरी तिथे का जात नाही ?

अ) कारण त्याला अनसुयेच्या बदनामीमुळे लाज वाटत असते

ब) कारण त्याला हरी व ज्ञानेश्वरवर सूड उगवायचा असतो

क)कारण तो येणाऱ्या नव्या चाकरमान्याची वाट पाहात असतो

ड) कारण तो अनसुया आणि येनुमावशीला घेऊन येत असतो.

४५. पाट्या लक्ष्याच्या कानात सितारामचा कोणता निरोप देण्यासाठी आलेला असतो ?

अ) सितारामला चहा हवा हा निरोप

ब) सितारामला मुंबईला न्यायला १०० खटखटे लाडू हवेत हा निरोप

क) सितारामला १०० रूपये उसने हवेत हा निरोप

ड) भोटमामाला चहा दे हा निरोप

४६.बोलीभाषेतून कोणती संस्कृती व्यक्त होत असते ?

अ) यंत्रसंस्कृती

ब) लोकसंस्कृती

क) ग्रामसंस्कृती

ड) महानगरी संस्कृती

४७.बोली का निर्माण होतात ?

अ) साहित्यामुळे

ब) माणसांच्या रंगामुळे

क) भौगोलिक व सामाजिक भेदांमुळे

ड) महागाईमुळे

४८.मालवणीला कृ.पां.कुळकर्णी यांनी कोणते नाव दिले आहे ?

अ) वाडवळी

ब) आगरी

क) कुडाळी

ड) राजापुरी

४९.मालवणी हे मराठीचे कोणत्या दोन रूपांदरम्यानचे संक्रमित रूप आहे असे सु.म. कत्रे म्हणतात?

अ) महाडी आणि कुडाळीच्या दरम्यानचे

ब) कुडाळी आणि वाडवळी दरम्यानचे

क) कोकणी आणि आगरी दरम्यानचे

ड) सामान्य मराठी आणि गोमंतकीय कोकणी दरम्यानचे

५०.मालवणीमध्ये कोणता लोकनाट्याचा प्रकार लोकप्रिय आहे ?

अ) पोवाडा

ब) भवनीभवै

क) दशावतारी खेळे

ड) सत्यशोधकी जलसे

५१.कुत्रा, कावळा अशा प्राणी पक्षीवाचक नामाचे मालवणीतील उच्चार कसे असतात ?

अ) दीर्घ ईकारान्त

ब) ओकारान्त

क) ऐकारान्त

ड) उकारान्त

५२. ‘मी येतलय’ या मालवणी वाक्याचा काळ ओळखा.

अ) वर्तमानकाळ  ब) भविष्यकाळ क)भूतकाळ ड) उभयविध काळ

५३. “आडवन कुत्री पारध करत नाय” या मालवणी म्हणीचा अर्थ काय होईल ?

अ) आडवे पडले की कुत्रे शिकार करत नाहीत

ब) आडव्या घरातली कुत्री शिकार करत नाही

क) जबरदस्तीने नेले तर कुत्रे शिकार करत नाहीत

ड) कुत्र्याचे भुंकणे अडवले तरी शिकार पळत नाही

५४. ‘शेनातलो किडो शेनात रवत नाय’ या म्हणीचा अर्थ ओळखा.

अ) माणसाची स्थिती कायम राहात नाही

ब) शेण उन्हात ठेवलं तर किडे राहात नाहीत

क) शेतात शेण टाकले तर किडे राहात नाहीत

ड) परिस्थिती माणसाला बदलवते

५५. 'झारंग्या' या मालवणी शब्दाचा अर्थ काय आहे ?

अ) पुऱ्या तळायचा झारा

ब) नारळाच्या झावळ्या

क) पालापाचोळा भरायची बांबुची टोपली

ड) कौलारू घरांत उन्हासाठी ठेवलेली काच

५६. 'बाळगो नी मालग्या' कवितेतील बाळग्या कोणाची शपथ घेतो ?

अ) आईची

ब) देवाची

क) महापुरूषाची

ड) वेताळाची

५७. 'आझन माझन' कवितेतील मुलगा मुलगी इतर मुले ओट्यावर खेळत असताना कुठे असतात ?

अ) माळ्यावर

ब) समुद्रावर

क) विहिरीवर

ड) शाळेत

५८. 'चेडवाक निरोप' या कवितेतील पिता मुलीला मुंबईला तिच्या नवऱ्याकडे जायला का सांगतो आहे ?

अ) कारण मुलीला शिकायचे आहे

ब) कारण मुलगी सासरी जाणे योग्य असे त्याला वाटते

क) एकट्या राहणाऱ्या जावयाची अबाळ होते म्हणून

ड) जावई आता चिडलाय म्हणून

५९. ‘व्हनीबाय’ला म्हातारीने कोणते आश्वासन दिले आहे?

अ) की ती मुंबईला जाईल

ब) की ती शेतात कामाला येईल

क) की ती तिचे ऋण पुढच्या जन्मी फेडेल

ड) की ती व्हनीबायला जुन्या साडीची गोधडी करून देईल

६०. ‘नया घरचो पावो खनताना’ या कवितेत पूर्वी बायका पतीची वाट कशी पाहात असे सांगितले आहे ?

अ) डोव्यात तेल घालून

ब) आतुरतेने

क) पळी दरवाजात बांधून

ड) काठवटात मीठ भरून

६१.कोणती गोष्ट सोबत आहे याने ‘वांगड’ कवितेतील म्हाताऱ्या बाईला दिलासा वाटतो ?

अ) मांजर सोबत आहे

ब) मुलाने दिलेला स्वेटर

क) बहिण सोबत आहे

ड)नातवाचे आंगडे टोपडे

६२. ‘मालवणी मेवो’ कवितेतील तरूण खालीलपैकी कोणत्या जत्रेला गेलेला नाही ?

अ)हिंदळे

ब) मुणगे

क) पाटपन्हळे

ड) कुणकेश्वर

६३. ‘नामो कुळकारा’चे स्वप्न काय आहे ?

अ) भरपूर भात पिकवायचे

ब)टाटा– बिर्ला बनायचे

क) ट्रॅक्टर विकत घ्यायचे

ड) मुलाला कलेक्टर बनवायचे

६४. 'नामा कुळकरा'वर खालीलपैकी कोणती संकटे येत नाहीत ते ओळखा ?

अ) बैल गमावणे

ब) पिकावर रोग पडणे

क) पावसाची दडी

ड) शेतातले वाळलेले गवत पेटणे

६५. 'भातालय' मधील शेतकरी त्याला कोणती गोष्ट कधीच जमणार नाही असे म्हणतो ?

अ) मासेमारी

ब) चिखलणी

क) नोकरी

ड) सावकारी

६६. 'मिरग' कवितेतील मुलाला आई आता कोणते कालवण करणार हे माहिती आहे ?

अ) मसुरीचे

ब) कुर्ल्यांचे

क) कर्लीचे

ड) शेंगांचे

६७. 'खेळे' कवितेतील तरूणाच्या एकेकाळच्या प्रेयसीचे डोळे कसे होते ?

अ) पिंगट

ब) मासोळीसारखे

क) घारे

ड) काळेभोर

६८. 'तांबेट पसरलेल्या मांडवात' या कवितेतील तरूणाच्या मनाची स्थिती गावातील संध्याकाळ आठवताना कशी होते ?

अ) मन आनंदते

ब) मन स्वप्नाळू होते

क) मन उसवते

ड) मन गावी जायला व्याकुळ होते

६९. 'शेताभातातला शिरवान' या कवितेतील कवीच्या मनात अलीकडे श्रावणातल्या सणांना धाकधुक का होते ?

अ) कारण तो शहरात हे सण साजरे करू शकत नाही

ब) कारण आईची आठवण त्याला येते

क) कारण धर्माचे रंग चढल्याने सणांना दंगली होतात

ड) कारण सणासुदीला खर्च खूप होतो.

७०. 'माझी माय' कवितेतील कवीला आईच्या कोणत्या गोष्टीचे आश्चर्य वाटते ?

अ) आईच्या कष्टाळूपणाचे

ब) आईच्या हातच्या चवीचे

क) आईला त्याला बरे नाही हे न सांगता कळते त्याचे

ड) आई सुनेशी कशी जुळवून घेते याचे

७१.जाळ्यात मासळी आल्यावर 'दर्याराजा' या कवितेतील कोळी कोणावरील श्रद्धा व्यक्त करतो ?

अ) समुद्रावरील

ब) येशू ख्रिस्तावरील

क) वेलंकनी देवीवरील

ड) मतमाऊली देवीवरील

७२. ‘गटारी’ या कवितेतील मुलांचा डोळा कोणाच्या कोंबड्यावर असतो ?

अ) खोताच्या

ब) कदमिणीच्या

क) कालेलकरणीच्या

ड) सावंतिणीच्या

७३.’तावडन आजी’ला आजारपणात काय खायची इच्छा असते ?

अ) कोंबडी

ब) आमो

क) कोलंबी

ड) मोसंबी

७४.चिं.त्र्यं खानोलकर यांच्या कोणत्या कादंबरीत कोकणातील अंधश्रद्धेचे दर्शन घडते ?

अ) अजगर

ब) रात्र काळी घागर काळी

क) कोंडुरा

ड) राखी पाखरू

७५.’बोवाळ घालणे’ या मालवणी वाकप्रचाराचा अर्थ काय आहे ते ओळखा.

अ) घोंगडी घालणे

ब) चुलीत आग घालणे

क) गोंधळ घालणे

ड) वेल मांडवावर घालणे

७६.बोली भाषेच्या अभ्यासात कोणत्या गोष्टीचा संदर्भ सतत लक्षात ठेवावा लागतो ?

अ)तिची अस्थिरता

ब) तिचे प्रमाणभाषेशी नाते

क) बोलीशी निगडीत संस्कृती

ड) बोलीमधील अपशब्द

७७..मालवणी लोकांची पैशांसंदर्भातील विशिष्ट मानसिकतेचे कारण काय असते ?

अ)अनुवंशिकता

ब) निसर्गाची अनिश्चितता

क) अंधश्रद्धाळूपणा

ड) आळशीपणा

७८. मालवणी भाषेत अधिक दीर्घ उच्चार असण्याचे कारण काय ?

अ) लांबवर ऐकू जाण्यासाठी

ब) आपले म्हणणे ठसवण्यासाठी

क)समुद्रसपाटीला मुबलक हवा उपलब्ध

ड) लाडीक बोलणे आवडत नाही म्हणून

७९."त्याने आमो खाल्ल्यान" या वाक्याचा काळ ओळखा.

अ) वर्तमानकाळ

ब) भूतकाळ

क) भविष्यकाळ

ड) अपूर्ण वर्तमानकाळ

८०."गाबत्याक गोरवा आनी भटाक तारवा कित्याक" या म्हणीचा अर्थ काय होईल ते ओळखा.

अ) कोळ्याला गुरे आवडत नाहीत आणि ब्राह्मणाला मासे आवडत नाहीत

ब) कोळी गुरे राखेल तर ब्राह्मण होडी वल्हवेल

क)  उपयोगाच्या गोष्टीच प्रत्येकाला महत्त्वाच्या

ड) थंडीत गारा पडतात आणि समुद्रात होड्या असतात

८१.वाढवाळ लौकर घालायला एक कारण कवितेतील शेतकरी काय देतो ?

अ) देवाचा कोप झाला आहे

ब) राखून ठेवलेला कोंबडा कोणीतरी पळवेल

क) जमिनी जाळायची वेळ झाली आहे

ड) सगळे रीतभात विसरत चालले आहेत

८२.म्हातारी बाई आपल्या फाटक्या लुगड्याचे वर्णन वहिनीबाईकडे कसे करते ?

अ) गोणपाटासारखे झाले आहे

ब) चिंध्या झाल्या आहेत

क) गवतासारखे झाले आहे

ड) झावळ्यांसारखे झाले आहे

८३.'बाळगो नी मालग्या' या कवितेतील बाळग्या आईला तो काय खेळत नाही असे सांगतो ?

अ)कबड्डी

ब) लगोरी

क) मटका

ड) क्रिकेट

८४'झेटलीमन' या कवितेतून मालवणी पुरूषाची कोणती मानसिकता व्यक्त होते ?

अ) खोटेपणा

ब) स्वतःबद्दल अवास्तव प्रतिमा

क) स्वकेंद्रीतता

ड) आत्मसंतुष्टता

८५. “नव्या घराचा पाया खणताना मिळालेल्या अवशेषांपैकी कोणत्या गोष्टी नव्या पिढीतील स्त्रियांना आवडतील ?

अ) काठवट

ब) सुगडं

क) खापरं

ड) काहीच नाही

८६.वारूळ कवितेतल्या भाच्याला आजुबाजूची मंडळी काय सांगतात ?

अ) म्हातारी रोज त्याला शिव्या देई

ब) म्हातारी रोज भांडण करे

क) म्हातारी रोज वाट पाहत असे

ड) म्हातारीला रोज चमचमीत खायला लागे

८७.दर्याराजा कवितेतील कोळ्याला दुपार झाली तरी घरी परत जावेसे का वाटत नाही ?

अ) कारण त्याला समुद्रावरचा वारा आवडतो

ब) कारण बायकापोरांना खायला काय देणार अशी चिंता वाटते

क)कारण समुद्रावर त्याची श्रद्धा आहे

ड) कारण त्याला होडी परत किनाऱ्याकडे नेता येत नाही

८८.जात्रा कवितेत गावकरी खांद्यावर काय घेऊन नाचत आहेत ?

अ) पालखी

ब) भाले

क) तरंग

ड) झेंडे

८९. नामो कुळकाराने सरकाराकडून घेतलेल्या आंब्याचे काय होते ?

अ) ते सुकतात

ब) ते पायरी,रायवळ निघतात

क) ते संकरीत निघतात

ड) ते कलमी हापूस निघतात

९०.गटारीचा बेत ठरवण्याच्या मिटींगमधून कोणी लौकर उठत का नाही ?

अ) कारण वर्गणीचे ठरत नाही

ब) कारण दारूचे ठरत नाही

क) कारण कोंबड्याचे ठरत नाही

ड) कारण पकल्या पोरींबद्दल बोलत राहतो

९१. चाकरमानी नाटकातला सोनक्याच्या भिक्या आणि कावळ्याचे कुळ एकच असे का म्हणतो ?

अ) कारण भिक्याचा आवाज कर्कश

ब) कारण भिक्या काळा आहे

क) कारण भिक्या स्वार्थी आहे

ड) कारण भिक्या तिरळा आहे

९२.चाकरमानी नाटकातील अनसुया सीतारामने पाठवलेल्या माशांचे काय करते ?

अ) भुजणं करते

ब) कालवण करते

क) तळते

ड) मासे घेत नाही

९३.पाट्या अंधश्रद्धेची टिंगल कशी उडवतो ?

अ) देवळात जात नाही

ब) दादा भटाचे तीर्थ फेकून देतो

क) घाडी मामाच्या गाऱ्हाण्याला देव म्हणून प्रतिसाद देतो

ड) कोणाचं सोयर सुतक मानत नाही

९४.दादा भटांबद्दल सखू गाबतिणीचे मत वाईट का आहे ?

अ) दादा भट फुकट मासे घेतो म्हणून

ब) दादा भटाच्या वडीलीं सखूच्या आईशी गैरवर्तन केले आहे

क)दादा भट लोकांची शिवाशिव मानतो

ड) दादा भट सोयरसुतक मानतो

९५.दादा भट सीतारामशी कशासंदर्भात स्पर्धा करू पाहतो ?

अ) पैशांसंदर्भात

ब) शिक्षणासंदर्भात

क) गाण्यासंदर्भात

ड) घरासंदर्भात

९६. भिक्याला आपल्या बायकोची बदनामी होते हे पाहून काय वाटते ?

अ) वाईट वाटते

ब) राग येतो

क) संशय वाटतो

ड) काहीच वाटत नाही

९७. होळीच्या दिवशी सीतारामला मारण्याचा बेत हरी आणि धेनग्या का करतात ?

अ) सीतारामने त्यांना पैसे दिले नाहीत म्हणून

ब) सीतारामने त्यांना ट्रंझिस्टरला हात लावू दिला नाही म्हणून

क) सीतारामने अनसुयेच्या बदनामीचा बेत हाणून पाडला म्हणून

ड) सीताराम होळीला वर्गणी देत नाही म्हणून

९८.सीतारामला कंगवा, पावडर हातात देऊन त्याच्यावर प्रभाव टाकण्याचे काम कोण करत असते ?

अ) धेनग्या , हरी, डिच्या

ब) पाट्या , येनू मावशी

क) दादा भट

ड)भिक्या व अनसुया

९९.गावकऱ्यांना उगाचच पैसे वाटल्याने सीतारामची अवस्था कशी होते ?

अ) सगळे त्याच्याकडे आकर्षित होतात

ब) सीतारामला रोज शहरात जावे लागते

क) सीतारामची कफ्फलक अवस्था होते

ड) सीताराम वेडसर होतो

१००.येनू मावशी नाटकाच्या शेवटी कोणावर चिडते ?

अ)सीतारामवर

ब) भिक्यावर

क) सगळ्या स्वार्थी गावकऱ्यांवर

ड) अनसुयेवर

------------------------------------------------------------------------------------------